# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषयः— Hiring Services अंतर्गत सेवा घेणेबाबत**

संदर्भः— १) जा.क्र.आस्थापना/४४१० दि.०४/११/२०१९ रोजीचे परीपत्रक

२) जा.क्र.आस्थापना/१२०१ दि.२८/०७/२०२० रोजीचे परीपत्रक

**Hiring Services** अंतर्गत सेवा उपलब्ध करून घेण्यासंदर्भात अधिकार मंडळाची मंजूरी मिळाली होती. सदर सेवा घेणे संदर्भात नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.३/१०/२०१९ व दि.१४/१/२०२० रोजीच्या बैठकीत ठरलेनुसार तयार करण्यात आलेली नियमावली उपरोक्त संदर्भीय परीपत्रकान्वये निर्गमीत करण्यात आली होती.

तथापि, याबाबत विविध विभाग व अधिविभाग उपरोक्त परीपत्रकामधील तरतूदींचे पालन न करता सदर सेवा घेत असलेचे दिसून येत आहे.

सबब, सर्व विभाग व अधिविभाग प्रमुखांना कळविण्यात येते की, **Hiring Services** अंतर्गत सेवा उपलब्ध करून घेताना, उपरोक्त संदर्भीय परिपत्रकामधील तरतूदींचे (सेवेचे स्वरूप, वयोमर्यादा, दोन नियुक्तीमधील खंड इत्यादी) तंतोतंत पालन करूनच संबधीत विभागांनी कार्यवाही करावयाची आहे. सदर परीपत्रकामध्ये नमूद तांत्रिक व विशेष कौशल्य असणा—या पदांचीच सेवा घेण्यात यावी. ज्या पदांची उपलब्धता हंगामी रोजंदारी सेवकांमधून तसेच एकत्रीत मानधनामधून होवू शकते, तसेच कनिष्ठ लेखनिक, शिपाई इत्यादी पदाशी निगडीत सेवा **Hiring Services** अंतर्गत घेण्यात येवू नये.

तसेच जे विभाग व अधिविभाग **Hiring Services** अंतर्गत उपरोक्त परिपत्रकामधील नमूद केल्यानुसार तांत्रिक व विशेष कौशल्य असणा—या सेवां व्यतीरिक्त सेवा घेत आहेत अशा सेवा तात्काळ थांबविण्यात याव्यात.

संबंधीत विभागांनी आवश्यक त्या हंगामी रोजंदारी पदांची विहित नमुन्यात प्रशासकीय मंजूरी घेवून आस्थापना विभागाकडे पाठविण्यात यावी. जेणेकरून संबंधीत विभागास हंगामी रोजंदारी सेवक उपलब्ध करून देण्यात येईल.

**कुलसचिव**

**जा.क.आस्थापना/** 1591

**दि.** 19 OCT 2020

**प्रति,**

1. सर्व विभागप्रमुख/संचालक/समन्वयक/अधिविभागप्रमुख
2. सर्व उपकुलसचिव व समकक्ष अधिकारी, कायदा अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
3. जनसंपर्क अधिकारी कार्यालयास
4. मा.प्रभारी कुलगुरू/कुलसचिव/संचालक—परीक्षा व मुल्यमापन मंडळ/ वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास
5. समन्वयक, विद्यापीठ संकेतस्थळ कक्ष – यांना Intranet वर प्रसिध्द करण्यासाठी

E:\RPA\2020\Other\Circuler.doc